# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ०४/०५/२०२४ (शनिवार) दुपार**

---

### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
### वाहनासह एकुण ४०,६०,०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त
### नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई

दिनांक ०३/०५/२०२४ रोजी मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे कन्हान हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, कन्हान हद्दीत मनसरकडुन कन्हानकडे एक टिप्पर वाहन अवैधरीत्या विनापरवाना रेती लोड करून नागपूर कडे वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून तारसा चौक कन्हान येथे नाकाबंदी केली असता १६ चक्का टिप्पर एम. एच–४०/सी.एम.–७७५२ चा चालक **आरोपी नामे– अरविंद जगदीश साकेत, वय २५ वर्ष, रा. ग्राम देवरी ता. बहेरी जि. सिंदी ह. मु. चनकापुर कॉलनी ता. सावनेर जि. नागपूर** याला स्टाफने थांबवून पाहणी केली असता वाहनामधील एकुण अंदाजे १० ब्रास रेती मिळून आल्याने सदर वाहन चालकास टिप्पर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपींच्या ताब्यातून १६ चक्का टिप्पर एम.एच–४०/सी.एम.–७७५२ किमती ४०,००,०००/–रू. त्यामध्ये १० ब्रास रेती किंमती ५०,०००/– रु. व ०१ मोबाइल किंमती १०,०००/–रू. असा एकूण ४०,६०,०००/– रु. चा मुद्देमाल जप्त करून **आरोपी नामे–** १) **अरविंद जगदीश साकेत, वय २५ वर्ष, रा. ग्राम देवरी ता. बहेरी जि. सिंदी ह. मु. चनकापुर कॉलनी ता. सावनेर जि. नागपूर मालक नामे– २) बलराम यादव रा. चनकापूर ता. सावनेर ३) क्रिष्णा यादव, रा. चनकापूर ता. सावनेर** असे एकुण ०३ आरोपी यांचेविरुद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ३७९, १०९, ३४ भारतीय दंडविधान संहीता–१८६०, सहकलम ४८(७), ४८ (८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम–१९६६, सहकलम ४, २१ खानी आणि खनीजे (विकास आणि नियमन) अधिनियम–१९५७, सहकलम ३, ४ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतीबंधक अधिनियम १९८४ अन्वये पो. स्टे. खापरखेडा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक किशोर शेरकी, पोना प्रणय बनाफर, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, बालाजी बारगुले विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.




## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई
## वाहनासह एकुण ५,०४,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक ०३/०५/२०२४ रोजी पोस्टे कुही येथील स्टाफ **पोस्टे परिसरात पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की**, मौजा वार्ड क्रं. ०५ भांडरकर चौक कडे जाणारा रोड येथे ट्रॅक्टर द्वारे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतूक होत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून नाकाबंदी करून **आरोपी नामे— गोपाल नत्थुजी पिंपळकर, वय ५५ वर्ष वार्ड क्रं. १७ नागोबा चौक कुही** हा आपल्या ताब्यातील मुंडा क्र. एम एच—४०/सी ए— ०२६८ ने अवैद्यरीत्या चोरटी रेतीची वाहतुक करतांनी मिळुन आल्याने चालकास रेती वाहतुकीचा परवाना (रॉयल्टी) विचारले असता रेती वाहतुकीचा कोणताही परवाना नसल्याचे सांगीतले. आरोपीच्या ताब्यातुन अंदाजे १ ब्रास रेती किंमती ४,०००/—रु. व वाहतुक करण्या करीता वापरलेली मुंडा क्र. एम एच—४०/सी ए— ०२६८ किंमती ४,००,०००/— रू. व ट्रॉली क्रं. एम एच—४०/एल— ६२१० किंमती १,००,०००/—रू. असा एकुण **५,०४,०००**/— रुपयाचा मुद्देमाल अवैद्यरित्या विनापरवाना वाहतुक करतांना मिळुन आल्याने कार्यवाही करुन जप्त करण्यात आला. **आरोपी** १) **गोपाल नत्थुजी पिंपळकर, वय ५५ वर्ष वार्ड क्रं. १७ नागोबा चौक कुही २) मालक रोशन प्रल्हाद धनजोडे वय ३३ वर्ष रा. मांढळ चौक कुही** यांचेविरूद्ध कलम ३७९, १०९ भा.द.वी सहकलम ४८ (७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६,

सहकलम ४, २१ खाण आणी खनिज (नियमन आणी विकास) अधिनीयम १९५७, सहकलम ३ सार्वजनीक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनीयम १९८४ अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, पोस्टे कुही येथील प्रभारी ठाणेदार दिपक अग्रवाल (भापोसे) यांचे मार्गदर्शनात पोउपनी स्वप्नील गोपाले, स. फौ. संजय कुलकर्णी, पो.शि राहुल देविकर, अनिल करडखेले म.पो.शि. दिशा गोंडाने पो.शि. अर्जुन नाकतोडे, पो. शि. आशिष चौधरी यांनी पार पाडली.



---

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर